# 1 जुलै 2023 शांतारामभाऊ घोलप जयंती अभिवादनपर कार्यक्रम

"जनसेवा शिक्षण मंडळ" संस्थापक अध्यक्ष माननीय. शांतारामभाऊ घोलप यांचा 1 जुलै जयंती अभिवादन पर कार्यक्रम महाविद्यालयाच्या ग्रंथालय इमारती मध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जनसेवा शिक्षण मंडळाचे सह-सचिन माननीय "हरड सर" यांनी दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन केले त्यानंतर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. जी. आर. विशे यांनी माननीय माजी महसूल मंत्री, जनसेवा शिक्षण मंडळ संस्थापक- अध्यक्ष कैलासवाशी शांतारामभाऊ घोलप साहेब यांच्या शैक्षणिक व आधुनिक कृषी कार्याची माहिती विद्यार्थी वर्ग व कर्मचारी वर्गाला दिली.

त्यानंतर संस्थेचे सहसचिव माननीय "हरड सर" यांनी माननीय शांतारामभाऊ घोलप साहेब यांच्या प्रत्यक्ष पाहिलेल्या कार्याचा आलेख सर्वांसमोर मांडला आधुनिक शेतीसाठी ते किती प्रयत्नशील होते याची अनेक उदाहरणे त्यांनी दिली. त्याचबरोबर मुरबाड तालुक्यातील अनेक धरणे बंधून शेती ओलिताखाली कशा पद्धतीने आणली याचे विवेचन त्यांनी केले मुरबाड तालुक्यामध्ये ऊस पिकाचा प्रयोग त्यांनी केला होता हेही त्यांनी आवर्जुन सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस.एम.बिराजदार यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. जी.एम. घुटे यांनी केले

कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.